




दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड अंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार ७ जानेवारी २०२५ | अंक२९ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


## आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी घेतली नाईक कुटुंबीयांची सांत्वनपर भेट

पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार चांगलेच ॲक्शन मोडवर आले आहेत. पुण्यातील खंडणी आणि दरोडेखोरीच्या घटनांना आळा बसावा यासाठी त्यांच्याकडून प्रचंड प्रयत्न केले जात आहेत. पण तरीही काही गुन्हेगारांकडून तसे गुन्हे केले जात आहेत. अशा गुन्ह्यांना आळा बसावा यासाठी आता पोलीस कमिश्नर अमितेश कुमार हे आक्रमक झाले आहेत. त्यांनी सर्व गुन्हेगार आणि त्यांच्या टोळींना सज्जड दम दिला आहे. खंडणीच्या माध्यमातून दहशत निर्माण करणारे आणि सर्वसामान्य जनतेची लुटमार करणाऱ्या गुन्हेगारांना सात जन्म लक्षात राहील, अशी कारवाई करू असा इशारा पुणे पोलीस आयुक्तांनी दिली आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार हे डॅशिंग आयपीएस अधिकारी आहेत. त्यांची जेव्हा पुण्यात बदली झाली होती तेव्हा त्यांनी पुण्यातील सर्व गुन्हेगारांची पोलीस ठाणे आवारात परेड काढली होती. पुण्यातील गुन्हेगाराच्या घटनांना आळा बसावा यासाठी त्यांच्याकडून सातत्याने प्रयत्न केले जात असतात. यावेळीदेखील त्यांनी आता आक्रमक पवित्रा घेत गुन्हेगारांना मोठा इशारा दिला आहे.

## आदर्शगाव वंजारवाडी येथे संत भगवान बाबा अखंड हरिनाम सप्ताचे आयोजन

बीड : तालुक्यातील आदर्शगाव वंजारवाडी येथे ऐश्वर्यसंपन्न संत श्री भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त भव्य-दिव्य असे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन मा. श्री वैजिनाथ नाना तांदळे, मा. श्री. सर्जेराव तात्या तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. वंजारवाडीच्या हरिनाम सप्ताहाचे परिसराला आकर्षण असते. हा सप्ताहा सर्वांगाने आदर्श असतो. यावर्षी या नामसप्ताहामध्ये महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार अनुक्रमे प्रथमदिनी हभप केशव महाराज भगवानगड, द्वितीय दिन हभप गितांजलीताई झेंडे पुरंदर, तृतिय दिन हभप विशाल महाराज खोले, चतुर्थ दिन सोपान महाराज कनेरकर विदर्भरत्न, पाचव्या दिवशी हभप विनोदाचार्य निवृती महाराज देशमुख (या किर्तनाची वेळ ६ ते ८) साहाव्या दिवशी हभप शिवाजी महाराज बावस्कर, सातव्या दिवशी हभप प्रकाश महाराज साठे , काल्याचे किर्तन हभपपपुगु रामानंद महाराज भारती यांचे ठिक ११ ते १ यावेळेत होईल व नंतर महाप्रसाद होईल. या नामसप्ताहामध्ये दैनंदिन कार्यक्रम काकडा, ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम महाराज गाथेचे भजन, हरिपाठ, किर्तन (किर्तन वेळ ८ ते १०) व हरिजागर असे कार्यक्रम होतील. गावाकडे चला, खेडे समृद्ध करुया, लेक वाचवा लेक शिकवा, झाडे लावा झाडे जगवा, सामाजिक सलोखा जपावा असे विविध संकल्प या नामसप्ताहामध्ये करण्यात येणार आहेत तरी आपण सर्वांणी या नामसप्ताहास उपस्थिती लावुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे अवाहन आदर्श गाव वंजारवाडीचे सरपंच मा.श्री. वैजिनाथ नाना तांदळे यांणी केले आहे.

## दररोज २०० रूपयांची बचत, तुमच्या मुलांना बनवणार करोडपती

मुंबई: नव्या वर्षाची सुरूवात नव्या उमेदीने झाली आहे. २०२५मध्ये लोकांनी आपले आर्थिक आरोग्य तंदुरूस्त राखण्यासाठी अनेक गोल्स निर्धारिसत केले आहेत. यातच जर तुम्हाला तुमच्या मुलांचे भविष्य आर्थिकदृष्ट्या मजबूत करायचे असेल तर नव्या वर्षात त्यांना खास गिफ्ट द्या. यामुळे २४व्या वर्षी ते करोडपती बनू शकतील. म्युच्युअल फंडबद्दल तुम्हाला सगळ्यांनाच माहित असेल. केवळ २०० रूपये प्रति दिवस अथवा ६ हजार रूपये प्रति महिना गुंतवणूक करून हे शक्य आहे. म्युच्युअल फंड म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करण्याची सगळ्यात सोपी पद्धत म्हणजे एसआयपी. ही एक लाँग टर्म इन्वेस्टमेंट प्रोसेस आहे. यात कंपाऊंडिंग फायदेही मिळतात तसेच जमा केलेला फंड वाढतो. आजच्या काळात केवळ शहरीच नव्हे तर ग्रामीण भागातील लोकही यात इंटरेस्ट दाखवत आहेत. दर महिना जमा करा ६ हजार रूपये नव्या वर्षात कशी आणि किती रूपयांची सुरूवात करता येईल ज्यामुळे करोडपती बनता येईल. याचे कॅलक्युलेशन अगदी सोपे आहे. जर तुम्ही दररोज २०० रूपये अथवा महिन्याला ६ हजार रूपये वाचवून एसआयपी करत असाल तर तुम्ही हे लक्ष्य गाठू शकता. एसआयपीमध्ये गुंतवणूकदारांना सामान्यपणे १५ ते १६ टक्क्यांपर्यंत व्याज मिळते. मात्र आपण साधारणपणे १२ टक्के व्याज पकडून चालू. तर ६००० रूपयांची एसआयपी २४ वर्षांसाठी केल्यास तुमचे १७,२८,००० रूपये जमा होतात. यावर कंपाऊंडिंगसोबतचे रिटर्न्स ८३,०८,१२३ रूपये होतील. या हिशेबाने एकूण मिळून जेव्हा तुमचे मूल २४ वर्षांचे होईल तेव्हा त्याच्याकडे १,००,३६,१२३ रूपयांचा फंड असेल. म्युच्युअल फंडमध्ये १२ टक्केच नव्हे तर कधी कधी १५ ते १६ टक्क्यांपर्यंत गुंतवणूकदारांना रिटर्न्स मिळतात.



# मनोज जरांगेंचा पुन्हा धनंजय मुंडेंवर हल्लाबोल;

## गुंडांना बोलायचे नाही का, आमचे मुडदे पडू द्यायचे का?

जालना। प्रतिनिधी मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी परभणीतील जनआक्रोश मोर्चातून मंत्री धनंजय मुंडेंवर थेट निशाणा साधला होता. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्ह व आरोपींच्या फाशीच्या शिक्षेची मागणी करत परभणीत मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चातील सभेत बोलताना मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडेंना लक्ष्य केलं. आरोपींवर धनंजय मुंडेंचा वरदहस्त असून त्यांचे गुंड आता देशमुख कुटुंबीयांना धमकी देत आहेत. यापुढे अशा धमक्या दिल्यास धनंजय मुंडेंना रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशाराच मनोज जरांगे यांनी दिला होता. त्यानंतर, मनोज जरांगे यांच्याविरुद्ध काही ठिकाणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर, वाशिममध्ये धनंजय मुंडे समर्थक रस्त्यावर उतरल्याचं दिसून आलं. यासंदर्भात बोलताना जरांगे यांनी पुन्हा एकदा धनंजय मुंडेंना लक्ष्य केलं. धनंजय मुंडे आणि त्याच्या ज्या टोळ्या पाळल्या आहेत, लोकांच्या पोरांची हत्या करण्यासाठी, खंडण्या वसूल करण्यासाठी, गुंडागर्दी करायला त्यांनी संतोष देशमुख यांची हत्या झाली तेव्हा ही तत्परता का दाखवली नाही. ही तत्परता संतोष देशमुख यांचा खून झाला तेव्हा दाखवणं गरजेचे होतं. दोन दिवस त्या बिचार्याचा मृतदेह पडून होता, केजच्या हॉस्पिटलमध्ये आणि पूर्ण मसाजोग गाव रस्त्यावर बसून होतं. त्यावेळेस ही तत्परता दाखवायची ना, असे मनोज जरांगे यांनी म्हटलं. आम्ही या धनंजय मुंडेला कधी बोललो का, परंतु त्याचे गुंड लोक संतोष देशमुख यांच्या भावाला सुद्धा दादागिरी करायला लागले, धमकी द्यायला लागले, अरेरावी करायला लागले. आम्ही त्याच्यावर बोलायचं नाही का? आमचे मुडदे पडू द्यायचे का?, असा सवाल जरांगे यांनी उपस्थित केला. मी जाती बद्दल बोललो का, गुंडाला बोलायचं नाही का अजिबात, ही कोणती पद्धत आहे. संतोष देशमुख यांच्या मंडळींनी आणि लेकरांनी कसं जगायचं. धनंजय देशमुख न्यायासाठी फिरतोय आणि आज त्याला जर धमक्या यायला लागल्या तर एवढा मोठा समाज असून माय बापाच्या भूमिकेनं समाज येणार नाही का, त्या लेकराला पाठिंबा द्यायचा नाही का?, असे अनेक सवाल मनोज जरांगे यांनी उपस्थित केले आहेत. गुंडाला पण बोलायचं नाही ही कोणती पद्धत आहे ही संघटित गुन्हेगारी आहे, यांनी टोळीचं नेटवर्क प्रचंड उभा केलंय. याचा नायनाट नाही का झाला पाहिजे, त्यांच्या जातीतल्या लोकांना वाटत नाही का याचा नायनाट झाला पाहिजे? याच्यात ओबीसी मराठ्यांचा संबंध काय, तुम्ही कचाकच लोक मारून टाकायला लागले. याच्यात मराठ्याचा, वंजाऱ्याचा, ओबीसींचा संबंध काय. तुमच्यावर वेळ आली की ओबीसी आणि वेळ गेली की फक्त तुमचेच, ही कुठली पद्धत आहे. खून होऊन आम्ही बोलायचं नाही मग तर अवघड झालं, असे म्हणत धनंजय मुंडेंवरील टीकेचा विरोध करणाऱ्यांना व रस्त्यावर उतरणाऱ्यांना जरागेंनी सवाल विचारले आहेत. ओबीसी नेते म्हणतात आरक्षणाची लढाई राहिली नाही. पण, ही लढाई आरक्षणाचीच आहे, आरक्षणाची लढाई कमी कधीच होणार नाही.२५ जानेवारी रोजी सामूहिक आमरण उपोषण होणार आहे.

## गावठी पिस्टल व काडतुस जप्त करुन दोन आरोपी केले जेरबंद

बीड। प्रतिनिधी पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या विरुध्द कडक कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यावरुन पोलीस निरीक्षक उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांनी अवैध अग्निशस्त्राची गोपनिय माहिती काढणेबाबत अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या. त्यावरुन दिनांक ०६/०१/२०२५ रोजी स्थागुशा बीड येथील पोह/ जफर पठाण यांना गुप्त बातमी मिळाली की, इसम नामे सोमनाथ राजाभाऊ चाळक रा.लहुरी ता.केज याचेकडे एक गावठी कट्टा असून तो लहुरी येथे जिल्हा परिषद शाळा जवळ थांबला आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळताच सदरची खबर पो.नि. उस्मान शेख यांना देवुन त्यांनी पुढील कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश पोह पठाण यांना दिले. त्यावरुन पोह पठाण यांनी सोबत स्थागुशा स्टाफ यांना घेवुन बातमी ठिकाणी जावुन सापळा लावला व लहुरी येथुन इसम नामे सोमनाथ राजाभाऊ चाळक रा.लाहुरी ता.केज हा यास ताब्यात घेवुन त्याचे जवळ कमरेला एक गावठी बनावटीची पिस्टल व दोन जिवंत काडतुस बेकायदेशीररित्या मिळुन आले. सदर आरोपीकडे अधिक चौकशी करता त्याने सदर गावठी पिस्टल विकास सुभाष सावंत रा.सावंतवाडी ता.केज जि.बीड याचेकडुन आणल्याने सांगितले त्यानंतर सुभाष सावंतचा शोध घेवुन त्यास सावंतवाडी येथुन ताब्यात घेतले आहे.

## तुम्ही लाडक्या बहिणींना जो शब्द दिला तो तरी पाळा एकनाथ खडसे यांचा महायुती सरकारवर निशाणा

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ आमदार एकनाथ खडसे यांनी महायुती सकारवर निशाणा साधला आहे. "निवडणुकीच्या दरम्यान सर्व मंत्र्यांनी हे वारंवार सांगितलं होतं की कुठल्याही लाडक्या बहिणीचे पैसे परत घेतले जाणार नाही. मतदानासाठी ह्यांनी सर्व नाटक केलं. लाडक्या बहिणींना आता तपासणीसाठी बोलवण्यात येत आहे. एक वेळ पैसा दिला तर तो परत तर घेऊ नका. एक वेळ तुम्ही तो शब्द दिला आहे तो तरी पाळा", असं म्हणत एकनाथ खडसे यांनी महायुतीवर निशाणा साधला. "उपमुख्यमंत्री अजित पवार हे सध्या कन्फ्युज म्हणजेच संभ्रमावस्थेत आहेत. त्यांची अस्वस्थता ही वेगवेगळ्या शब्दांमधून बाहेर येत आहे. आता सुद्धा मतदारांना त्यांनी जे सांगितलं आहे हे त्यांच्या अस्वस्थतेतून बाहेर निघालेले शब्द आहेत", अशी प्रतिक्रिया एकनाथ खडसे यांनी दिली. यावेळी त्यांनी शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्या वक्तव्यावरही प्रतिक्रिया दिली. "आता हे सारे निवडून आलेले आहेत. त्यामुळे काम सरो आणि वैद्य मरो असं यांचं चाललंय", अशी टीका एकनाथ खडसे यांनी केली.




## जिल्हा माहिती कार्यालयात मराठी पत्रकार दिन साजरा

बीड। प्रतिनिधी बीड जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित दर्पण दिन अर्थात मराठी पत्रकार दिनाचा कार्यक्रम आज कार्यालयात पत्रकारांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. कार्यक्रमात दर्पण दिनानिमित्त दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने कार्यालयाला श्री. बाळशास्त्री जांभेकर यांची एक प्रतिमा भेट देण्यात आली. मराठी पत्रकार परिषदेचे राजेंद्र होळकर तसेच विलास डोळसे यांनीही प्रतिमा जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांना प्रदान केली. येणाऱ्या काळात पत्रकारांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या दृष्टिकोनातून विविध प्रकारच्या योजनांचे अर्ज आणि इतर बाबींवर यावेळी जिल्हा माहिती अधिकारी यांनी माहिती दिली. येणाऱ्या काळात पत्रकारांची आरोग्य तपासणी करणे तसेच त्यांच्या रक्तगट नोंदवही चे काम करणे आदीबाबतही यावेळी चर्चा झाली. यावेळी पत्रकार सुनिल क्षीरसागर, संपादक वैभव स्वामी, विलास डोळसे, साहस आदोडे, अविनाश कुलकर्णी, संजय हंगे, मंगेश निटूरकर, सुभाष चौरे,विशाल सोळंके, प्रचंड सोळंके, राजेंद्र होळकर, शेखरकुमार, श्रीमती आयशा शेख, सर्जेराव देशमुख, श्री. जाधव, सतीश केजकर, छायाचित्रकार लक्ष्मन नरनाळे , लक्ष्मन गायकवाड इत्यादी पत्रकार, छायाचित्रकार उपस्थित होते जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी वरिष्ठ लिपिक श्रीमती बी.जी. अंबिलवादे, सहाय्यक छायाचित्रकार, एकनाथ मुजमुले, लिपिक टंकलेखक श्रीमती रेवती लाबडे, लिपिक टंकलेखक सावता गुंजाळ, वाहन चालक, दिपक पवार, शिपाई छगन कांडेकर. आदींची देखील या कार्यक्रमास उपस्थिती होती

# जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेसाठी खा.सोनवणेंनी घेतली पोलीस महासंचालकांची भेट



## खासदारांनी नोंदविली आभ्यासपूर्ण निरीक्षणे

बीड: मागील काही वर्षात बीड जिल्ह्यात गुंडगिरी वाढलेली असून यास राजकिय नेत्यांचा वरदहस्त आहे. यामुळे जिल्ह्यात अनेक अवैध धंदे चालत असून याच अवैध धंद्यातून पैसा येतो, तथापी, याच पैशातून गुंडाराज फोफावत असून जिल्ह्यातील गुंडाराजचा खात्मा करावा, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी राज्याचे पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) संजय सक्सेना यांची भेट घेवून केली. यावेळी सक्सेना यांनी कोणाचीही हयगय केली जाणार नाही, असे म्हटले.सक्सेना यांना दिलेल्या निवेदनात बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था प्रभावित करणाऱ्या गंभीर मुद्यांवर आभ्यासपूर्ण निरीक्षणे निदर्शनास आणून दिली. यात पोलीस ठाण्याच्या स्तरावर राजकीय हस्तक्षेप खूपच जास्त आहे, ज्यामुळे प्रभावी आणि निष्पक्ष पोलीसिंगला अडचणीत येतात. गावगुंड, जे अनेकदा प्रभावशाली राजकीय नेत्यांच्या पाठिंब्यावर कार्यरत असतात, त्यांनी पोलीस ठाण्यांशी संगनमत करून जमीन बळकावणे, वाळू उत्खनन, बेकायदेशीर दारू उत्पादन, आणि जुगार अड्डे अशा बेकायदेशीर क्रियांना चालना दिली आहे. गोदावरी नदी पट्ट्यात, विशेषत: गेवराई, माजलगाव, आणि परळी तालुक्यांमध्ये वाळू माफिया सक्रिय आहे. ज्याचा काळा पैशामध्ये वार्षिक उलाढाल कोट्यावधींची आहे. वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या अनेक मोठ्या गाड्या राजकीय नेत्यांच्या निकटवर्तीयांच्या नावे नोंदणीकृत आहेत. वाळू माफियांकडे मोठ्या प्रमाणात रोख रक्कम, बेकायदेशीर शस्त्रे, बनावट नंबर प्लेट असलेल्या वाहने, आणि महसूल विभागाशी मजबूत संबंध आहेत. वाळू माफियांकडून वापरली जाणारी काही वाहने पोलीस कर्मचाऱ्यांच्या वित्तपुरवठ्यावर चालतात, अशी माहिती मिळते. कांही सरकारी अधिकारी, विशेषत: पोलीस व महसूल विभागाचे, वाळू माफियांशी संबंधित असून, त्यांना धाडीबाबत आगाऊ माहिती पुरवतात, ज्यामुळे कायद्याची अंमलबजावणी कमकुवत होते. अनेक पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी त्यांच्या नियुक्त्या राजकीय नेत्यांच्या शिफारसीवरून मिळवतात, ज्यामुळे अंमलबजावणीत पक्षपातीपणा होतो आणि पारदर्शकतेचा अभाव दिसतो. बीड जिल्ह्यातील बेकायदेशीर कृतींमुळे दरवर्षी हजारो कोटी रुपयांचा काळा पैसा निर्माण होतो, ज्यामुळे भ्रष्टाचार अधिक वाढतो आणि प्रशासन कमकुवत होते. वरील सर्व प्रकार गेल्या कांही वर्षात कांही विशिष्ठ लोकांच्या कृतिमुळे जिल्ह्याची प्रतिमा डागाळली जात आहे. उद्योजक जिल्ह्यामधे नवीन उद्योग उभारण्यास तयार होत नाहीत. परिणामी बेरोजगारी वाढत आहे व त्यातून तरुणांचा कल बेकायदेशीर कृत्याकडे वाढत आहे. जिल्ह्यातील कांही राजकीय नेते, कायदा अंमलबजावणी यंत्रणा आणि बेकायदेशीर कृत्य करणारे यांच्यातील साखळीवर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे, असेही निवेदनात म्हटले आहे.

बीड/महाराष्ट्र

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार ७ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## सं पा द की य

## अयोध्येतील पुनर्निर्मित राम मंदिराची वर्षपूर्ती

अयोध्या येथे मर्यादा पुरुषोत्तम प्रभु श्रीरामाच्या बालक रामललाच्या मूर्तिची गेल्यावर्षी अर्थात पौष शुक्ल द्वादशी म्हणजे २२ जानेवारी २०२४ रोजी प्राणप्रतिष्ठा विधिवत झाल्यानंतर आता त्या सोहळ्याला एक वर्ष पूर्ण होत आहे. तेव्हापासून तर सतत अयोध्या आणि नवपुर्ननिर्मित राममंदिर याबाबतची चर्चा सर्वप्रकारच्या माध्यमातून होत आहे आणि वाचनातही येत आहे. पूर्वी होत नव्हती का तर असे नाही परंतु अलीकडे ती जरा जास्तच होत आहे आणि त्याला राजकीय नजरेतून पाहिले जात आहे. आज येथे त्रेता युगातील कथाकहाण्या सांगण्याची आवश्यकता नाही कारण हिंदूच्या धार्मिक पूजास्थळांवर परकीय शत्रू अर्थातच मुस्लीमांनी देवीदेवतांचा अपमान करुन देवस्थान नष्ट केलीत आणि असे प्रकार हजारोंनी घडलेली आहेत. मागील इतिहासाकडे पाहता प्रामुख्याने अयोध्या येथील प्रभू श्रीरामाचे जन्मस्थान ते समूळ नष्ट करून तेथे बाबरी मशीद बांधण्यात आली आणि श्रीरामाचे जन्मस्थान परत मिळावे यासाठी देशव्यापी प्रचंड आंदोलन झाले, रस्त्यावर संघर्ष करण्यात आला, तर दुसरीकडे न्यायालयातही दाद मागण्यासाठी कायदेशीर लढाही लढला गेला आणि स्वतंत्र भारताच्या इतिहासामध्ये ही संघर्षाची एक महत्त्वपूर्ण नोंद झाली. आश्चर्य असे की कायदेशीर लढ्यामध्ये श्रीरामाच्या अस्तित्वाबाबत प्रश्नचिन्ह ही निर्माण करण्यात आले होते आणि असा प्रश्न निर्माण करणारे तत्कालीन काँग्रेस पक्षाचे खासदार सुप्रसिद्ध वकील कपिल सिब्बल हे होते. हे आपल्या हिंदू समाजाचे दुर्दैव. एकीकडे कायदेशीर मार्गाने न्यायालयात तर दुसरीकडे रस्त्यावर हिंदू समाजातील सर्व जाती, धर्म, पंथ, संप्रदाय, भाषा, आपापले भेदाभेद विसरून संघटितपणे जन्मभूमीसाठी संघर्षरत होते. वेळोवेळी तत्कालीन केंद्र आणि राज्य सरकारांचे लक्ष वेधण्यासाठी विरोध प्रदर्शन, रामरथ यात्रा, एकात्मता यात्रा, अयोध्येमध्ये कारसेवा व जेल भरो आंदोलन असे विविध मार्गाने आंदोलने करण्यात आली होती आणि यात अर्थात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनात विश्व हिंदू परिषद आणि भारतीय जनता पक्षासह अन्य समविचारी संस्था-संघटनांचा प्रत्यक्ष सक्रिय सहभाग होता हे वेगळे सांगण्याची काही आवश्यकता नाही. न्यायालयामध्ये कायदेशीर लढाईचे शेवटी सर्वोच्च न्यायालयात जवळपास ४० दिवस दररोज नियमित सुनावणी होऊन अखेर ९ नोव्हेंबर २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाने रामजन्मभूमी अर्थात रामललाच्या बाजूने आपला निकाल दिला. न्यायालयाच्या निकालाप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने अयोध्येमध्ये मंदिर बांधण्यासाठी एक न्यास ट्रस्ट स्थापित केला. गेल्या २२ जानेवारी २०२४ रोजी रामजन्मभूमीवर पुनर्निमित मंदिरामध्ये रामलला मूर्तीची प्राणप्रतिष्ठा विधिवत संपन्न झाली. मंदिराच्या परकोटा परिसरामध्ये एकूण १८ मंदिरे बांधली जात आहे. यामध्ये दशावतार, शेषावतार, निषादराज, शबरी, अहिल्या, संत तुलसीदास, शिव, सर्य, मां दुर्गा, अन्नपूर्णा, श्रीगणेश, हनुमान आदींच्या मंदिराचा समावेश आहे. मंदिर निर्माण समितीचे प्रमुख नृपेन मिश्र यांचेनुसार हा मंदिर प्रकल्प जून २०२५ पर्यंत पूर्ण होईल. या जन्मभूमी मुक्ती आंदोलनामध्ये प्रत्येक हिंदूंचा प्रत्यक्ष सक्रिय सहभाग होता आणि प्रत्येक कामात उत्साहाने भाग घेतला, हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. यामागे निश्चितच प्रभू श्रीरामाच्या जन्मभूमीवर भव्य मंदिराचे पुनर्निर्माण आणि त्यासाठी गेले सुमारे ५०० वर्षांहून अधिक काळापासूनचा जो संघर्ष आणि नंतर विशेषत्वाने स्वतंत्र भारतामध्ये आपल्याच हिंदू समाजातील एका अर्थाने काँग्रेस पक्षाच्या श्रीराम विरोधी मानसिकतेच्या विरोधात आणि न्यायालयात कायदेशीर लढा द्यावा लागला, हे एक दुर्दैव; परंतु यासाठी संघाने श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या आहवालानुसार गेल्यावर्षी २०२४ मध्ये देशव्यापी गृहसंपर्क अभियान राबविले होते, यामध्ये सर्व प्रातांच्या ५ लाख ७८ हजार ७७८ गावे, ४७२७ नगरांतील एकूण १९९,८४,९०७१ परिवारापर्यंत संपर्क साधला गेला आणि यामध्ये संघ स्वयंसेवकांसह ४४ लाख ९८ हजार ३३४ कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला होता. याबरोबर अयोध्या येथे प्राणप्रतिष्ठा समारोहाच्या दिवशी २२ जानेवारी २०२४ रोजी संपूर्ण देशभर जवळपास ५ लाख ५९ हजार २३१ ठिकाणी ९ लाख ८५ हजार ६२५ कार्यक्रम यशस्वीपणे पार पडले. या कार्यक्रमामध्ये २७ कोटी ८१ लाख ५४ हजार ६६५ रामभक्त श्रद्धाळू प्रत्यक्ष सहभागी झाले होते. अयोध्येमध्ये राम मंदिर आणि प्राणप्रतिष्ठा समारोहामुळे देशभर एकूण वातावरण राममय झाले होते असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही आणि यावेळी हिंदू समाजाने आपल्या एकजूट, संघटन शक्तीचा परिचय संपूर्ण देशवासीयांना करून दिला आहे. ही संघटित शक्ती प्रभू श्रीरामाच्या प्रेरणेमुळेच आहे. हिंदू समाज आपल्यावर होत असलेल्या अन्यायाचा मुकाबला जसा सामूहिक संघटित शक्तीद्वारे करतो तर दुसरीकडे तो समाजातील अनिष्ठ प्रथा, जातीय भेदाभेद, दूर करण्यासाठी रचनात्मक कार्यामध्ये दीन दलित, पीडित, शोषित, वंचिताचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांच्या आरोग्याची काळजी, अन्य समाज घटकांबरोबर आणण्यासाठीदेखील हिंदू समाज सक्रिय भूमिका निभावत आहे, असे दृश्य आपल्याला पाहावयास मिळते. ङ्गसंघटन में शक्ति हैफ याची प्रचिती दिसून येते. अयोध्या येथे तर गेल्यावर्षी प्राणप्रतिष्ठा समारोहाचे प्रसंगी पूर्ण नगरामध्ये घरोघरी प्रत्येकाने आपापल्या ठिकाणी मंदिरात, मठामध्ये, धर्मशाळा, येणाऱ्या भाविकांसाठी भोजन, चहा-नाश्ता आदींची व्यवस्था केली होती. यामध्ये स्थानिक जैन, बौद्ध, शीख बांधवांचा तितकाच सिंहाचा वाटा होता. राम मंदिर निर्मितीसोबत आता संपूर्ण अयोध्या आणि आजूबाजूच्या परिसराचा सर्वांगीण विकास आणि त्यासंबंधी विविध प्रकल्प उत्तर प्रदेशच्या योगी सरकारने हाती घेतलेले आहेत आणि यात प्रमुख सडक मार्गाचे रुंदीकरणासोबतच सुशोभीकरण, साफसफाई स्वच्छता तसेच रेल्वे मार्ग आणि गाड्यांचे जाळे मोठ्या प्रमाणावर झालेले आहे. अयोध्येचे अत्याधुनिक रेल्वेस्टेशन आहे. येथे नवीन विमानतळ बांधण्यात आले असून त्याला महर्षी वाल्मिकी आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नामकरण करण्यात आले. अयोध्या विमानतळ हे देशभरातील प्रमुख मोठ्या महानगरांशी जोडले गेले. २०२५ मध्ये प्रयागराजला महाकुंभ असल्याने वाराणसी व अयोध्या येथे येणाऱ्या तीर्थयात्रेकरूंची ही संख्या निश्चितच वाढणार आहे

# बाळशास्त्री जांभेकर या उत्तुंग व्यक्तिमत्वास प्रणाम

मराठी वृत्तपत्राचे जनक आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठीतील सर्वात पहिले वृत्तपत्र ६ जानेवारी रोजी सुरु केले. त्यामुळे ६ जानेवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो . या दिवशी जांभेकर यांचे स्मरण करुन त्यांच्या कार्याचा आढावा घेतला जातो. बाळशास्त्री जांभेकर हे मुळात अतिशय कुशाग्र , उच्च गुणवत्ता असलेलं व्यक्तिमत्त्व होतं . ब्रिटिशांचे भारतात आगमन झाले , त्यानंतर २९ जानेवारी १७८० रोजी पश्चिम बंगालमध्ये ङ्गबेंगॉल गॅझेट म नावाचे साप्ताहिक सुरु करण्यात आले. आपले विचार प्रभावीपणे मांडण्यासाठी वृत्तपत्र हे माध्यम अत्यंत प्रभावी आहे , याची जाणीव हळूहळू भारतीयांना होऊ लागली . त्यानंतर बेंगॉल गॅझेटच्या अर्ध्या दशकाने म्हणजेच ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या पहिल्या मराठी वृत्तपत्राची सुरुवात केली . जांभेकर यांना दर्पणकार म्हणून ओळखले जाते . ब्रिटिश कालखंडात इंग्रजांच्या विरोधात लिखाण करण्यास मनाई होती . अशा परिस्थितीतही जांभेकर यांनी दर्पणच्या संपादकपदाची धुरा समर्थपणे सांभाळली होती. दर्पणमध्ये नेमकं काय प्रकाशित होई ?-दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. त्यावेळी हा अंक मराठी तसेच इंग्रजी अशा दोन्ही भाषेत म्हणजेच जोडभाषेत प्रकाशित केला जायचा . एक इंग्रजी आणि एक मराठी असे दोन स्तंभ या वृत्तपत्रात असत . मराठी जनतेला देशात काय सुरु आहे हे समजावे म्हणून स्तंभ मराठीत लिहिला जायचा . तर वृत्तपत्रात काय लिहिले आहे , हे ब्रिटिशांना समजावे म्हणून दुसरा स्तंभ इंग्रजीत लिहीला जायचा . इंग्रजी सत्तेचे कायम लक्ष असूनही तब्बल साडे आठ वर्षे दर्पण हे वृत्तपत्र चालले. ङ्गदर्पणफ या पहिल्या मराठी वृत्तपत्राच्या माध्यमातून देशात मराठी पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवणारे बाळशास्त्री जांभेकर मराठी भाषेतील आद्य पत्रकार आहेत . ६ जानेवारी १८१२ ला कोकणात एका सामान्य घरात जन्माला आलेल्या बाळशास्त्री यांचे जीवनमान अवघ्या ३४ वर्षांचे होते . पण त्यांच्या विचारांचा ठेवा , कार्याची पद्धत आणि समाजात प्रबोधन घडवून आणण्यात मोलाचा वाटा आहे . बाळशास्त्री जांभेकर यांचे पहिलं मराठी दैनिक ६ जानेवारीला प्रसिद्ध झाल्याने हा दिवस ङ्गमराठी पत्रकार दिनफ म्हणून साजरा केला जातो . ममराठी पत्रकार दिनीफ जाणून घेऊयात त्यांच्या आयुष्यातील काही तथ्य ! १९ व्या शतकाच्या सुरूवातीला जेव्हा भारतामध्ये ब्रिटीश राजवटीची सुरूवात झाली होती , तेव्हा त्या काळात बाळशास्त्री जांभेकर हे विद्याविभुषित, पंडीत व्यक्तिमत्त्व काम करत होते. ङ्गबाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीफच्या विद्यालयात अभ्यास करून त्यांनी विशीच्या आत कोणाही भारतीयाला तोवर न मिळालेली प्राध्यापक म्हणून नियुक्ती मिळवण्याइतपत ज्ञान कमवले . इ.स. १८३४ साली एल्फिन्स्टन कॉलेजात पहिले एतद्देशीय व्याख्याते म्हणून जांभेकरांची नियुक्ती झाली . जेम्स ऑगस्टस हिकीच्या इंग्रजी मबेंगॉल गॅझेटफ या साप्ताहिकानंतर बाळशास्त्रींनी ५० वर्षांनी दर्पण हे पहिलं मराठी वृत्तपत्र सुरू केल . दर्पण ६ जानेवारी १८३२ ला प्रसिद्ध झाला आणि अवघ्या २० वर्षांच्या पण पंडीत असणाऱ्या बाळशास्त्री जांभेकरांनी संपादकपदाची धुरा सांभाळली. जांभेकरांनी प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून कोकणातील शिलालेख आणि ताम्रपट यांच्यावर शोधनिबंध लिहिले . मुद्रित स्वरूपातील ज्ञानेश्वरी त्यांनीच प्रथम वाचकांच्या हाती दिली. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन केले . समाजातील वर्ण व्यवस्था , जातीभेद , स्त्री दास्य , सती , अस्पृश्यता , बालविवाह यांवर त्यांनी दर्पणच्या माध्यमातून लिखाण केल्याने त्यांना आद्य समाजसुधारकही म्हटलं जाऊ लागले. बाळशास्त्रींना मराठी , संस्कृत , बंगाली , गुजराती , कानडी , तेलुगू , फारसी , फ्रेंच , लॅटिन आणि ग्रीक या दहा भाषांचे ज्ञान होते . भाषांसोबतच विज्ञान, गणित , भूगोल, शरीरशास्त्र आणि सामान्य ज्ञान या विषयांचीही चांगली जाण होती. बाळशास्त्री जांभेकर म्हणजे बहुआयामी, बहुभाषिक आणि उत्तुंग व्यक्तिमत्त्व . बाळशास्त्री जांभेकर यांनी महाराष्ट्राला पहिले वृत्तपत्र देऊन वैचारिक अभिसरणाची पेरणी केली . त्यांच्यानंतर वृत्तपत्र हे वैचारिक क्रांतीचे महत्त्वाचे साधन बनले. जांभेकर हे एक अतिशय हुशार आणि बहुआयामी व्यक्तिमत्व होते . त्यांना संस्कृत , मराठी , इंग्रजी आणि हिंदी या भाषा चांगल्या अवगत होत्या . शिवाय ग्रीक , लॅटिन , फ्रेंच , बंगाली आणि गुजराती या भाषांवरही त्यांचे प्रभुत्त्व होते . भूगोल , विज्ञान , गणित अशा विषयात ते पारंगत होते . रॉयल एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकात शोधनिबंध प्रसिद्ध झालेले ते पहिले भारतीय आहेत . बाळशास्त्रींनी कुलाबा वेधशाळेचे संचालक म्हणूनही काम पाहिले . अशा या उत्तुंग व्यक्तिमत्त्वास मनापासून प्रणाम. चला या निमित्ताने पत्रकारिता म्हणजे काय ते जाणून घेऊ : वृत्तपत्रकारिता : वृत्तपत्राच्या किंवा नभोवाणी वा दुरचित्रवाणी यांसारख्या जनसंज्ञापनांच्या माध्यमातून वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या वृत्तविषयक गरजा भागवण्याचे कार्य म्हणजे ङ्गवृत्तपत्रकारिताफ असे म्हणता येईल. लोकशाही राज्यव्यवस्थेची इमारत कायदेमंडळ, राज्यशासन , न्यायसंस्था व पत्रकारिता या चार आधारस्तंभावर उभी असते . ही कल्पना प्रथम मेकॉलेने १८२८ मध्ये आपल्या ङ्गकॉन्स्टिटट्यूशनल हिस्टरीफ या निबंधात मांडली . वृत्तपत्रांच्या संदर्भात त्याने ङ्गचौथी शक्तीफ असा शब्दप्रयोग केला होता . पत्रकारितेची मुख्यत: तीन कार्ये असतात : माहिती देणे , उदबोधन करणे आणि मनोरंजन . ही कार्ये चांगल्या रितीने पार पाडता यावीत म्हणून वृत्तपत्रे व पत्रकार यांना स्वातंत्र्याची आवश्यकता असते . निर्मितिखर्चापेक्षा कमी किंमतीला विकली जाणारी एकमेव वस्तू म्हणजे वृत्तपत्र होय . वृत्तपत्राच्या विक्रीतून कागदाचा खर्च जेमतेम भरून निघतो . वृत्तपत्रांना आपले सर्व प्रकारचे खर्च जाहिरांतीच्या उत्पन्नातून भागावावे लागतात आणि आवश्यक असा फायदा कमवावा लागतो . पत्रकारितेचे विविध प्रकार : पत्रकारितेची उद्दिष्टे, स्वरूप , कार्य यांनुसार विविध प्रकार संभवतात . विकास पत्रकारिता , शोध पत्रकारिता, अन्वयार्थक पत्रकारिता , नवपत्रकारिता हे त्यांतील काही प्रमुख प्रकार होत. वृत्तपत्र - कार्यालय : वृत्तपत्र संस्थेचे तीन प्रमुख घटक असतात . (१) अधिकारांची रचना (२) मालक/संचालक मंडळ/ विश्वस्त मंडळ, (३) वृत्तपत्र कार्यालयातील विविध विभाग . वृत्तपत्रव्यवसायातील गरजांनुसार वृत्तपत्र कार्यालयाचे सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे विभाग असतात : (१) संपादन विभाग , (२) मुद्रण विभाग, (३) वितरण विभाग, (४ ) जाहिरात विभाग , (५) प्रशासन विभाग . दररोज सकाळी नियोजित वेळापत्रकाप्रमाणे वृत्तपत्र कचेरीचे काम सुरु होते . या दृष्टीने संपादकाची सकाळची बैठक ही महत्त्वाची असते . या बैठकीला वृत्तसंपादक , वृत्तकक्ष प्रमुख , मुख्य वार्ताहर , सहसंपादक तसे गरजेप्रमाणे इतर संपादक उपस्थित असतात . आदल्या दिवसाच्या कामाची या बैठकीत तपासणी होते . इतर वृत्तपत्रांच्या तुलनेत आपण कोठे मागे पडलो वा कोठे आघाडी मारली याची कसून छाननी होते . आज घडणाऱ्या संभाव्य गोष्टींची चर्चा होते व त्या आधारावर आजच्या कामाचे नियोजन सुरु होते . याच माहितीच्या आधारे सहसंपादकांच्या बैठकीमध्ये संभाव्य अग्रलेख-विषयांची चर्चा होते . पुढील काही दिवसांसाठी कोणाचे व कोणते लेख मागवावे लागतील याचे , तसेच सदरांचे नियोजन होते. वृत्तपत्राचे पहिले पान व सर्वसाधारण बातम्यांची काही पाने तयार करणाऱ्या रात्रीच्या मुख्य उपसंपादकाचे काम अत्यंत महत्त्वाचे असते व पूर्वी त्यास त्या दिवशीच्या वृत्तपत्राचाशल्पकार समजले जाई. त्याच्या कौशल्यावरच त्या दिवशीच्या वृत्तपत्राची विश्वासार्हता , गुणवत्ता व आकर्षकता अवलंबून असते . या कामात त्याला वेळोवेळी आपल्या वरिष्ठांचा दूरध्वनीवरुन सल्ला मिळत असतोच . अचानक महत्त्वाची बातमी आल्यास छपाई थांबवून तिचा समावेश करण्याचाही त्यास अधिकार असतो. बातम्यांचे संपादन : वृत्तपत्र-कचेरीत वृत्तसंस्थांकडून , परगावच्या आणि शहरातील वार्ताहरांकडून , तसेच इतर मार्गांनी दूरमुद्रक , दूरध्वनी , तारा , फॅक्स , निवेदन आदी माध्यमांद्वारे घटनांचे वृत्तांत येत असतात .



चंद्रकांत शेळके
तहसीलदार, बीड

# बेकायदेशीर मासेमारी रोखण्यासाठी येत्या गुरुवारपासून ड्रोनचा वापर

मुंबई : बेकायदेशीर मासेमारी रोखण्यासाठी महाराष्ट्र सरकार ९ जानेवारी रोजी मासेमारी जहाजांसाठी ड्रोन-आधारित मॉनिटरिंग आणि डिजिटल डेटा देखभाल यंत्रणा सुरू करण्यासाठी सज्ज झाली आहे. त्यामुळे पारंपारीक मच्छीमारांना दिलासा मिळणार आहे. राज्याच्या सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) कायदा, २०२१ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र सरकार ९ जानेवारी रोजी मासेमारी जहाजांसाठी ड्रोन-आधारित मॉनिटरिंग आणि डिजिटल डेटा देखभाल यंत्रणा सुरू करण्यासाठी सज्ज आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पालघर (शिरगाव), ठाणे (उत्तन), मुंबई उपनगर(गोराई), मुंबई शहर (ससून डॉक), रायगड (रेवदंडा, श्रीवर्धन), रत्नागिरी (मिरकरवाडी, साखरीनाटे) आणि सिंधुदुर्ग (देवगड) या ठिकाणी ९ ड्रोन उड्डाणाची प्रात्यक्षिके करण्यात आली. वेगवान ड्रोन एकाच वेळी अनेक भागांवर लक्ष ठेवण्यास मदत करतील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ड्रोनचा वापर करून मासेमारी नौकांचे मॅपिंग केल्यानंतर विभागाकडे अनधिकृत मासेमारी नौकांची माहिती सहज उपलब्ध होईल. सागरी पोलिस विभागाच्या समन्वयाने राज्याच्या किनारी भागावर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोनचा वापर केला जाईल, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. ते सागरी सुरक्षा वाढवण्यासही मदत करतील. ड्रोन प्रणाली राज्याच्या ७२०किमी लांबीच्या किनारपट्टीपासून सागरी हद्दीपर्यंत १२ सागरी मैलांचे अंतर कव्हर करेल. अनधिकृत मासेमारी नौकांच्या संदर्भातील पुरावा म्हणून ड्रोन प्रणालीद्वारे प्रवाहाचा वापर केला जाईल. राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे म्हणाले की, विभागाची जहाजे सहसा गस्त घालतात. पण गस्ती नौकांना प्रत्येक बोटीची तपासणी करणे शक्य नाही. अनधिकृत बोटी अनेकदा निसटतात आणि पकडणे कठीण असते. ड्रोन मॉनिटरिंग सिस्टीमचा फायदा होईल आणि ते किनारी भागांची सुरक्षा वाढविण्यात मदत करेल. ड्रोनच्या वापरामुळे विभागाला पाण्यावर अधिक प्रभावीपणे गस्त घालण्यास मदत होईल, अनधिकृत मासेमारी नौकांची माहिती पुराव्यासह मिळेल आणि सागरी कायद्यानुसार कठोर कारवाई करणे सोयीचे होईल, असे राणे म्हणाले.

# जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेचा क्रिडा महोत्सव ५ ते १२ जानेवारी दरम्यान होणार-रणवीर पंडित

गेवराई-प्रतिनिधी जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत यावर्षीही भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून दि.५ जानेवारी ते १२ जानेवारी दरम्यान महोत्सव होणार आहे. कबड्डी स्पर्धा खो-खो स्पर्धा, व्हॉलीबॉल स्पर्धा बॅडमिंटन स्पर्धा, बुद्धिबळ स्पर्धा आणि अथलेटिक्स स्पर्धा होणार असून होणार आहेत. क्रीडा महोत्सवातून गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आणि क्रीडा प्रेमींना आनंदाची पर्वणी ठरणार आहे अशी माहिती शारदा स्पोर्ट्र्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांनी दिली. यावेळी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या १८०० खेळाडूंना मोफत किटचे वाटप करण्यात आले. शारदा स्पोर्ट्र्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत असणाऱ्या विविध शाळेच्या माध्यमातून क्रिडा महोत्सवाचे गेल्या दोन वर्षापासून आयोजन करण्यात येत आहे, हे तिसरे वर्ष असून रविवार दि.५ जानेवारी ते रविवार दिनांक १२ जानेवारी पर्यंत हा महोत्सव होणार आहे. याबाबतची माहिती महोत्सवाचे आयोजक रणवीर पंडित यांनी दिली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या हक्काचे मैदान मिळावे आणि त्यांच्या



क्रीडा गुणांना वाव मिळावा म्हणून या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेच्या विविध शाळेमध्ये या स्पर्धा होणार आहेत. दिनांक ५ जानेवारी रोजी क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या उपस्थित गेवराई शहरातील शारदा विद्या मंदिर येथे होणार आहे. यावेळी मुलीच्या गटात कबड्डी स्पर्धा होतील. मुले आणि मुलींच्या गटात बुद्धिबळाच्या स्पर्धा होणार आहेत. दिनांक ६ जानेवारी रोजी शारदा विद्या मंदिर येथेच मुलाच्या गटात कबड्डीच्या स्पर्धा होतील. दिनांक ७ जानेवारी रोजी माध्यमिक विद्यालय तलवाडा येथे मुला मुलीच्या गटात व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. दिनांक ८ जानेवारी रोजी जयभवानी विद्यालय गढी येथे मुलीच्या गटात खो-खो स्पर्धा आणि बॅडमिंटन स्पर्धा तर ९ जानेवारी रोजी जयभवानी विद्यालयाच्या मैदानावरच मुलांच्या गटात खो-खो आणि बॅडमिंटन स्पर्धा संपन्न होतील. दि.१० आणि ११ जानेवारी रोजी शिव शारदा पब्लिक स्कूलच्या मैदानावर मुला मुलींच्या गटात अथलेटिक्स स्पर्धा होतील १२ जानेवारी रोजी अथलॅटिक्स स्पर्धेचे अंतिम सामने होतील. माजी आमदार अमरसिंह पंडित, विद्यमान आमदार विजयसिंह पंडित, जयभवानी शिक्षण संस्थेचे सचिव जयसिंग पंडित यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करुन क्रीडा महोत्सवाचा शानदार समारोप होईल. दरम्यान रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली जयभवानी जगदंबा शिक्षण संस्थेचे सर्व क्रीडा शिक्षक क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत असून आज रणवीर पंडित यांच्या हस्ते संस्थील १८०० विद्यार्थी खेळाडूंना किटचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सह प्रशासन अधिकारी प्रा. काशिनाथ गोगुले यांच्यासह संस्थेचे सर्व मुख्याध्यापक, प्राध्यापक आणि शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ७ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



# स्वयंसेवी संस्थेकडून शालेय उपयोगी वस्तूंची भेट

पुणे : इनरवेल क्लब ऑफ पुणे रिव्हर रिदमस या स्वयंसेवी संस्थेतर्फे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकरवाडी येथे शालेय उपयोगी वस्तूंची भेट देण्यात आली. तसेच नुकतेच विद्यार्थ्यांना गरम कपड्यांचे वाटप करण्यात आले. भेट देण्यात आलेल्या साहित्यात दोन सिलिंग फॅन, स्मार्ट टीव्ही, मुलांना ट्रॅक सुट, खुर्च्या, शूजस्टॅन्ड, मुलांना स्वेटर, कानटोपी, टेबल, कपाट, खेळाचे साहित्य आणि मुलांसाठी खाऊ आदींचा समावेश आहे. संस्थेच्या अध्यक्षा निकिता मित्तल, सचिव दिप्ती सरोगी, प्रियंका गुप्ता, प्राची अगरवाल, व्रिद्धी गुप्ता अतुल अग्रवाल, नागेश कड, जि. प. प्रा. शाळा आगळंबेचे शिक्षण सत्तार तांबोळी, जि. प. प्रा. शाळा ठाकरवाडीच्या प्रभारी मुख्याध्यापिका मनीषा बुंदे, सहशिक्षिका देवश्री रेपाल, ठाकरवाडी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कैलास पायगुडे आदी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जि. प. प्रा. शाळा आगंळबेचे मुख्याध्यापक मच्छिंद्र हिलाळ यांनी भुषविले. निकीता मित्तल, नागेश कड, सत्तार तांबोळी यांनी मनोगत व्यक्त केले. देवश्री रेपाल यांनी सुत्रसंचालन केले. मनीषा बुंदे यांनी आभार मानले.

चौथीत शिकणाऱ्या मुलीने केली मदत

व्रिद्धी गुप्ता या चौथीत शिकणाऱ्या मुलीने दिवाळीत स्वत: पणत्यांची डिझाईन करून विक्री केली होती. त्यातून मिळालेल्या पैशातून या मुलींने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकरवाडी (ता. हवेली) या शाळेतील 18 विद्यार्थ्यांना स्वेटर व कानटोपी भेट दिली. व्रिद्धी गेल्या काही वर्षांपासून दिवाळीत पणत्या विकते. त्यातून मिळालेल्या पैशातून ती सामाजिक कार्य करते, असे तिच्या पालकांनी सांगितले.

# संतोष देशमुख हत्या प्रकरण!

## तपासावर परिणाम होऊ नये म्हणून धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्या

मुंबई। प्रतिनिधी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची आज छत्रपती संभाजी राजे यांच्यासह अंबादास दानवे, विजय वडेट्टीवार, ज्योती मेटे, सुरेश धस, बीडचे खासदार आमदारांनी भेट घेतली. याबाबत आमदार सुरेश धस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सर्वांची मागणी एकच होती, की, संतोष देशमुख हत्याप्रकरणातील तपासावर परिणाम होऊ नये म्हणून धनंजय मुंडे यांनी राजीनामा घ्यावा असे धस म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही भेटत राजीनाम्याची मागणी करणार असल्याचे धस म्हणाले. त्यांच्याकडे गृह खाते आहे. संभाजीराजे यांनी सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला असल्याचे धस म्हणाले. स्वपक्षाची कुठेही नाराजी नाही. मी चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबतही बोलणार आहे. मी मात्र संतोष देशमुखबद्दल बोलणं थांबवणार नाही असेही धस म्हणाले. अजितदादांवर काय टीका केली, त्यांना लागायचं काय कारण आहे असेही धस म्हणाले. माझ्याकडून अनवधानाने एक शब्द अरे तुरे केला तो शब्द परत घेतलाय. अजित दादांवर माझा हक्क आहे अरे तुरे बोलण्याचा असेही धस म्हणाले. अजित पवार यांच्यासोबत मी फार काळ काम केले आहे. अधिकार वाणीने मी त्यांचा एकेरी उल्लेख केला होता असे सुरेश धस म्हणाले. एक नैतिक जबाबदारी म्हणून अरे तुरेची भाषा करायला नको होती, मी दिलगिरी व्यक्त करतो असेही सुरेश धस म्हणाले. वंजारी समाजाच्या ९० टक्के लोकांना हे पटलेले नाही. गॅंग्ज ऑफ वासेपूर यांचाही त्रास मुकादमांना झाला आहे. त्यामुळे वंजारी समाजाचे मुकादम त्रासलेले आहेत असे धस म्हणाले. माझे दोन्ही मोबाईल तुमच्याकडे आहेत त्यांच्या सोबत माझे संभाषण झालेले नाहीत असे धस म्हणाले. मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितल्यानंतर मी पुढे जाणारा कार्यकर्ता नाही असेही धस म्हणाले. मी या प्रकरणावर हृदयापासून बोलत आहे. इतर कुठल्याही विषयावर मी बोलत नाही. उद्या बावनकुळे यांचीही भेट घेणार असल्याचे धस म्हणाले. माझी माध्यमांना विनंती आहे की कदाचित नितीन बिकड हा सहआरोपी होऊ शकतो. आरोपी त्याने सांभाळले आहेत असेही सुरेश धस म्हणाले. आज किंवा उद्या हा बिकड आत जाऊ शकतो. ज्यांचा रेकॉर्ड आहे, त्यांनी मला शिकवण्याची गरज नाही असे धस म्हणाले. माझ्यासोबत फोटो असेल तर प्रसिद्ध करा. याचा अर्थ आम्ही तेवढे जवळ नाहीत, जेवढ्या जवळ हे धनंजय मुंडे व वाल्मिक कराड यांच्या जवळ आहेत असेही धस म्हणाले. मी सांगितल्या तारखेला हे तिथे दिसतील.१९ जून २०२४ मध्ये सातपुडा बंगल्यावर बैठक झाली होती. त्या बैठकीत हा नितीन बिकड होता. ओम साई राम कंपनी कुणाकडे आहे, ते तपासा असेही धस म्हणाले.

# मातोश्री ग्राम समृद्धी योजनेंतर्गत रखडलेले शेत पाणंद रस्ते पावसाळ्यापूर्वी पुर्ण करण्यात यावेत; जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना निवेदन :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.०६ ) ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आणली मात्र शासकीय नियमांच्या कचाट्यात योजना सापडली असुन प्रसिद्धी माध्यमांद्वारे गाजावाजा करण्यात आलेल्या योजनेचे वास्तव क्लेशदायक असुन बीड जिल्ह्यातील मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजनेंतर्गत शासनाने मंजुरी दिलेल्या २०७४ कामांपैकी केवळ ४४८ कामे म्हणजेच २३ टक्केच कामे पूर्ण झाली असुन ग्रामीण भागात ही योजना मृगजळ झाली असुन ग्रामस्थांना स्वखर्चाने रस्ते करण्याची वेळ आली असुन



जिल्हा प्रशासनाने तातडीने प्रलंबित शेत/ पाणंद रस्त्यांची कामे सुरू करून पावसाळ्यापूर्वी पुर्ण करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष ( इंटक), सखाराम बेंगडे, बीड जिल्हासचिव (इंटक),शेख युनुस,सुदाम तांदळे, शेख मुबीन, शिवशर्मा शेलार यांनी अविनाश पाठक जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत रोहयो मंत्री भरत गोगावले यांना केली आहे.पावसाळ्यापूर्वी शेत/पाणंद रस्ते पुर्ण करण्याच्या शासन परिपत्रकात सुचना शेत/ पाणंद रस्त्यांची कामे पावसाळ्यात करणे अडचणीचे असते.सदर कामांना खरीप हंगामानंतर सुरूवात केल्यास कामे विना खंड पुर्ण होऊ शकतात ही बाब विचारात घेऊन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीच्या काळात म्हणजेच उन्हाळ्याच्या कालावधीत पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. आर्थिक वर्षामध्ये प्रारंभी पासुनच शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांना सुरुवात होणे आवश्यक असल्याचे मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत शासन परिपत्रकात म्हटले आहे.मोबाईल मानिटरींग अँप आदी किचकट नियमांमुळे रस्त्यांची कामे प्रलंबित :- डॉ.गणेश ढवळे शेतवस्त्या आणि पाणंद रस्त्यांच्या कामांची बीड जिल्ह्यात मोठी समस्या निर्माण झाली आहे.मोबाईल मानिटरींग अँप मुळे मजुरांची हजेरी घेणे अवघड झाले आहे.सदरील हजेरीसाठी सार्वजनिक कामासाठी दिवसातून दोन वेळा मजुरांचे फोटो काढावे लागत असल्याने व कामावर मजूर दाखवणे अवघड झालेले आहे. त्यामुळे रस्त्यांची कामे रखडलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे किचकट प्रक्रियेमध्ये सुलभता आणण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

# किनवट येथे पत्रकार दिन साजरा

## मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेडच्या वतीने पत्रकारांचा सत्कार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट येथे मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पत्रकार दिन व दर्पणदिन साजरा करण्यात आला.प्रारंभी मराठी वृत्तपत्राचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.तसेच मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेडच्या वतीने पत्रकार बांधवांचे पुष्पगुच्छ व पेन देऊन सत्कार करण्यात आला.





पत्रकारांच्या सन्मानानंतर ज्येष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांनी नेहमीच मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड या संघटनेचे आम्हाला सहकार्य मिळत असून पत्रकार आणि मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी सामाजिक कार्यात एका दिलाने वावरत असल्याची प्रतिक्रिया यावेळी त्यांनी दिली.

यावेळी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष प्रा.दगडू भरकड,शामराव फाळके ,राजू शिंदे, सुशील कदम संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष सचिन कदम विक्रम पवार,राजू कानवटे मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष फुलाची गरड पाटील ज्येष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर के.मूर्ती तालुका सचिव बालाजी सिरसाट कार्याध्यक्ष किरण ठाकरे ,बापूसाहेब तुप्पेकर,आनंद सोनटक्के,माधव सूर्यवंशी,गौतम येरेकार, भोजराज देशमुख,नशिर तगाले, बबन वानखेडे ,शिवाजी काळे, आदी पत्रकार उपस्थित होते.

# कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती निमित्त महिला शेतकरी मेळावा साजरा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेड -१ च्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने महिला शेतकरी मेळावा ३ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आला . त्यानिमित्ताने महिलांचे दिवसेंदिवस आहार आणि आरोग्याकडे दुर्लक्ष होत चालले आहे , हे लक्षात घेऊन महिला मार्गदर्शनासाठी अनुभवी आहारतज्ञ आणि डॉक्टर यांना प्राचारण केलं गेलं.कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले,राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ, देवी सरस्वती यांच्या प्रतिमा पूजनाने मान्यवरांच्या हस्ते आणि भा. कृ. अ. नु. प. गीताने करण्यात आली.स्वागत समारंभानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महेश अंबोरे यांनी केले. त्यानंतर तज्ञ डॉ. सुरेखा




पवार निवघेकर यांनी आरोग्य शिबीर घेऊन महिलांशी चर्चा करून सल्ला व मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी आरोग्याची काळजी किशोरवयीन अवस्थेपासून वृध्द अवस्था इथपर्यंत सर्व महिलांनी आरोग्याची कशी काळजी घ्यावी आणि महिलांच्या विविध आजारांचे कारणे यावर सविस्तर चर्चा करून मार्गदर्शन केले. त्यानंतर आहारतज्ञ सौ.उर्मिला जाधव यांनी देखील खाण्याच्या चुकीच्या सवयी, अन्न शिजवन्याच्या अयोग्य पद्धती, दिवसाची पूर्तता यावर सखोल अशे मार्गदर्शन महिलांना सादरीकरणातून करण्यात आले. सदरील कार्यक्रमासाठी महाविद्यालयीन विद्यार्थिनी व शेतकरी महिलांचा समावेश होता . विशेष महिलांसाठी ङ्गमूल्यवर्धित पाककला स्पर्धाआयोजित करण्यात आली होती त्यामध्ये महिलांनी विशेष सहभाग नोंदवला व विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.अध्यक्षीय भाषणनंतर शेतकरी महिला आणि उपस्थित उद्योजिका यांचे मनोगत जाणून घेऊन प्रा. संदिप जायभाये यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करून राष्ट्रगीताने सदरील कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सदरील कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. एस. डी .मोरे आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देविकांत देशमुख यांच्या मार्गर्शनाखाली प्रा. सौ.अल्का पवळे पाटील यांनी आयोजित केला असून कार्यक्रमासाठी कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ आणि कर्मचारी यांची विशेष उपस्थिती लाभली.असे बोलले जात आहे. बाहेरचे पालकमंत्री आल्यास त्याची पुनरावृत्ती आता सुद्धा होऊ शकते. पालकमंत्री हे प्रत्यक्ष जनतेची संपर्क साधण्याचे टाळतात यामुळे अनेकांचे कामे रखडली जातात. सर्वसामान्य पासून सगळ्यांनाच आपले काम करून घेण्यासाठी मध्यस्थी गाठावा लागता

# चौसाळा महाविध्यालायात वाचन-संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रमाचे उद्घाटक

चौसाळा-प्रतिनिधी कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभागातर्फे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमाचे उदघाटन संपन्न झाले. १ ते १५ जानेवारी दरम्यान हा पंधरवडा विविध कार्यक्रमाने साजरा होणार आहे. उदघाटक म्हणून बोलताना प्राचार्य डॉ.विलास भिल्लारे म्हणाले की, सध्याच्या काळात वाचन संस्कृती लोप पावत असून विधार्थ्यांनी दर्जेदार पुस्तकाचे सतत वाचन केले पाहिजे. समाजावर आपल्या कर्तुत्वाचा ठसा निर्माण करणाऱ्या थोर व्यक्तींच्या आत्मचरित्राचे वाचन केले पाहिजे. अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य प्रा.चांगदेव शेळके म्हणाले की, वाचन संस्कृतीला गतिमान करण्यासाठी पुस्तके विकत घेऊन वाचण्याची सवय विधार्थ्यांनी स्वतःला लावली पाहिजे. यावेळी व्यासपीठावर पदयुत्तर संचालक प्रा.डॉ. सुधाकर वणवे, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.अमर अलदे, प्रा.डॉ.संजय कदम उपस्थित होते. या पंधरवाड्यात ग्रंथालय स्वच्छता, ग्रंथप्रदर्शन, पुस्तक परिक्षण, कथा कथन स्पर्धा, कविता वाचन असे विविध कार्यक्रमाचे आयोजन कण्यात आले आहे असे ग्रंथपाल प्रा.डॉ.पंढरीनाथ हिरवे यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले. आभार प्रा.सुधीर माने यांनी केले. यावेळी प्राध्यापक विद्यार्थी मोठया संखेने उपस्थित होते.

# पोलीस म्हणावे की गुंड?

## खासदाराला पोलीस अधिका-याची धमकी!

## सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश मुंडे यांची वादग्रस्त पोस्ट, खा.सोनवनेंकडून कॉल रिकॉर्डिंग तपासण्याची मागणी

बीड: वादग्रस्त सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश मुंडे यांनी बीड पोलीस प्रेस ग्रुपफ्वर शनिवारी सायंकाळी एक पोस्ट केली. ज्यामुळे पोलीस दलात वादळ उठले. ङ्गया खासदाराची चड्डी सुध्दा जागेवर राहणार नाही, मी जर प्रेस घेतली तरफ अशी पोस्ट मुंडे यांनी केली. यामुळे पोलीस दलात पोलीस आहेत की गुंड अशी चर्चा सुरू झाली असून खा.बजरंग सोनवणे यांनी सदरील पोलीस अधिका-याची कॉल रेकॉर्डिंग तपासण्याची मागणी केली आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथे ९ डिसेंबर रोजी सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्रात संताप व्यक्त केला गेला. या हत्येचा तपास आता सीआयडी, एसआयटी आणि न्यायालयीन पातळीवर सुरु झालेला आहे. या हत्येच्या पाठीशी जे राजकीय लोक आहेत, त्यांच्याबद्दल जनमाणसात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी आरोपींना कठोर शिक्षा करण्याची मागणी केलेली आहे. दरम्यान बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करत बीडमधील सपोनि.गणेश मुंडे आणि सपोनि.दहिफळे या दोन सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिर्कायांचे कॉल रेकॉर्ड तपासण्याची मागणी केली आहे. खासदार सोनवणे यांच्या मागणीनंतर बीड पोलीस खळबळ उडाली आहे. दहिफळे आणि मुंडे या दोघांबद्दलही सर्वसामान्यासोबतही पोलीस दलात देखील फारसे चांगले बोलले जात नाही. त्यातच सपोनि.गणेश मुंडे यांनी एसपींच्या अधिपत्याखाली सुरु केलेल्या बीड पोलीस प्रेस या व्हाटस्अप ग्रुपवर शनिवारी




सायंकाळी एक पोस्ट केली. ज्यामध्ये म्हटले होते की, ङ्गया खासदाराची चड्डी सुध्दा जागेवर राहणार नाही, मी जर प्रेस घेतली तरफ असे म्हटले आहे. या पोस्टवर काही पत्रकारांनी विचारपूस केल्यानंतर सदरील पोस्ट मुंडे यांनी डिलिट केली, आणि स्थागुशाचे पो.नि.उस्मान शेख यांनी मुंडे यांना ग्रुपमधून काढून टाकले.अशा वाचाळ आणि धमकी देर्णाया पोलीस अधिर्कायावर एसपी नवनीत कांवत काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ७ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## विमा कंपनीच्या अधिका-यांना गेस्ट हाऊसमध्ये डांबलं

अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापूरमध्ये भाजप आमदार हरीश पिंपळे यांचा रौद्रावतार बघायला मिळाला. आमदार पिंपळे यांनी विमा कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मुर्तीजापुर येथील शासकीय विश्रामगृहाच्या खोलीत अक्षरश: डांबलं. तर विमा कंपनीच्या हलगर्जीपणामुळे 2023 मधील 530 शेतकऱ्यांना पंतप्रधान कृषी विमा योजनेचा लाभ मिळाला नाही. त्याच्याच रागातून आमदार हरीश पिंपळे यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विश्रामगृहाच्या खोलीत डांबलं. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत अधिकाऱ्यांना खोलीतून बाहेर काढणार नसल्याचा निर्धार आमदार पिंपळे यांनी केला.विशेष म्हणजे याच वेळी घटनास्थळावर पोलीस आणि महसूल अधिकारी दाखल झाले. त्यांनी आमदार हरीश पिंपळे यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण ते ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हते. अखेर जिल्हाधिकाऱ्यांनी आमदार हरीश पिंपळे यांच्यासोबत बातचित करत विमा कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मुक्त करण्याची मागणी केली. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत महत्त्वाचं आश्वासनही दिलं. जिल्हाधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर हरीश पिंपळे यांनी विमा कंपनीच्या अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांना मुक्त केलं. जिल्हाधिकाऱ्यांनी काय आश्वासन दिलं? विमा कंपनीच्या हलगर्जीपणामुळे 2023 मधील 530 शेतकऱ्यांना पंतप्रधान पिक विमा योजनेचा लाभ मिळाला नाही. त्याच्याच रागातून आमदार हरीश पिंपळे यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विश्रामगृहाच्या खोलीत डांबल होतं. जिल्हाधिकाऱ्यांनी आठ दिवसांत हा प्रश्न मार्गी लावतो, असं आश्वासन दिलं. यानंतर आमदार हरीश पिंपळे यांनी विमा कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मुक्त केलं. पुढच्या आठ दिवसात त्या 530 शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाहीत तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आमदारांनी दिला आहे.

# पुरावा नाही तोपर्यंत.......?, धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर अजित पवारांचं मत



**बीड,/प्रतिनिधी**

बीड सरपंच हत्या प्रकरणी एक मोठी बातमी समोर येत आहे. या प्रकरणात भाजप आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर नाव घेत आरोप केले आहेत. तसेच विरोधकांकडूनही धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले जात आहेत. विरोधकांचं एक शिष्टमंडळ आज राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या भेटीसाठी गेलं. या शिष्टमंडळाने राज्यपालांकडे धनंजय मुंडे यांच्याबाबत तक्रार करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही दबाव वाढला आहे. विशेष म्हणजे विरोधकांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी राज्यपालांची भेट घेतल्यानंतर आणखी महत्त्वाच्या घडामोडी घडल्या.

मंत्री धनंजय मुंडे हे आज दुपारी मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दालनात पोहोचले. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाली. यानंतर धनंजय मुंडे यांनी या प्रकरणावर माध्यमांना फार प्रतिक्रिया न देता परत जाणं पसंत केलं. यानंतर आता अजित पवार धनंजय मुंडे यांचा मंत्रिपदाचा राजीनामा घेणार का? याबाबतची अतिशय महत्त्वाची माहिती सम ोर आली आहे.अजित पवार यांचं मुंडेंच्या राजीनाम्याबाबत मत काय?संतोष देशमुख हत्या प्रकरणात जोपर्यंत धनंजय मुंडे यांच्या विरोधात पुरावा नाही, तोपर्यंत त्यांच्यावर कारवाई नाही, असं अजित पवार यांचं मत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. सूत्रांनी ङ्कटीव्ही ९ मराठीफ्ला याबाबत माहिती दिली आहे. या प्रकरणात एसआयटी चौकशी, न्यायालयीन चौकशी पूर्ण होईपर्यंत कारवाई नाही, असं अजित पवार यांचं मत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. न्यायालयीन चौकशी, एसआयटी आणि सीआयडी चौकशी होईपर्यंत कारवाई नाही. तीनही चौकशींमध्ये जो दोषी असेल, त्यावर कारवाई करणार, अशी अजित पवार यांची भूमिका असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांचा सध्या तरी राजीनामा घेतला जाणार नाही, असे संकेत मिळत आहेत. अजित पवारांच्या भेटीनंतर धनंजय मुंडे यांची आजची प्रतिक्रिया काय?दरम्यान, अजित पवार यांच्या भेटीनंतर आज धनंजय मुंडे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. ङ्कनवीन वर्षाच्या शुभेच्छा देण्यासाठी आज अजित पवार यांची भेट घेतली. पदभार स्विकारल्यानंतर माझ्या खात्यासंदर्भात दोन -तीन बैठका झाल्या आहेत, काही निर्णय घेतले आहेत, त्या संदर्भात चर्चा करण्यासाठी ही भेट होती. संतोष देशमुख हत्या प्रकरणावर कोणतीही चर्चा झाली नाही. कोणी काय आरोप करावेत हा ज्याचा त्याचा विषय आहे. लोकशाहीने प्रत्येकाला अधिकार दिला आहे, मी काय प्रत्येकाचं तोंड धरू शकत नाही. ज्या पक्षातील नेत्यांकडून आरोप होत आहेत, त्या पक्षाच्या अध्यक्षांना हा प्रश्न विचारा. पोलीस यंत्रणा काम करत आहे. माझ्याकडे जेव्हा संशयानं पाहिलं जातं, तेव्हा या संदर्भात मी अधिक बोलणं योग्य नाही. ज्या तपास यंत्रणांची नियुक्ती करण्यात आली आहे, त्यांचा तपास पूर्ण होऊ द्या, मीडिया ट्रायल सुरु आहे. पण ट्रायल कोर्टात होऊन द्या, तपास यंत्रणा काम करत आहेत, असं धनंजय मुंडे म्हणाले.

# छत्रपती साखर कारखाण्याचा ऊस बिलाचा हप्ता रु २७०० ने बँकेत वर्ग - व्हा.चेअरमन मोहनराव जगताप

माजलगाव दि.०७ (प्रतीनिधी) : सावरगाव येथील छत्रपती सहकारी साखर कारखान्याने चालू गाळपातील उसाचा पहिला हफ्ता दोन हजार सातशे रुपयांनी बँकेत वर्ग केला आहे.

छत्रपती सहकारी साखर कारखाना सोनाजीनगर सावरगाव ता. माजलगाव जिल्हा बीड या कारखान्याने गळीत हंगाम २०२४-२५ मधील दि. २७/११/२०२४ ते दि. १५/१२/२०२४ पर्यंत एकूण ४४९४१.८६८ मे. टन उसाचे गाळप केले असून त्याचे बिल २७००/- रुपये प्रति टना प्रमाणे एकूण रक्कम १२१३४३०८७/-



रुपये बँकेत वर्ग केले आहेत.तसेच कारखान्याचे कार्यक्षेत्रातील उसाचे गाळप करण्यासाठी कारखाना प्रशासनाने योग्य पद्धतीने नियोजन करून उसाचे गाळप करीत आहे व योग्य वेळी सर्व शेतक-यांचे बिल बँकेत जमा केली आहेत. कारखान्याचे चेअरमन मा.श्री.बाजीराव सोनाजीराव जगताप व सर्व संचालक मंडळ यांनी कारखान्याचे गाळप क्षमता कमी असताना सुद्धा शेतक-यांचे हित जपत व कारखान्याकडे कुठलेही उपपदार्थ नसताना सुद्धा योग्य भाव देऊन नियोजन करून गाळप करण्यास कटिबद्ध आहे. तरी भागातील शेतक-यांनी आपला ऊस कारखान्यास देऊन सहकार्य करावे व ऊस उत्पादक शेतक-यांनी आपापली बीले आपल्या भागातील संबंधित बँकेस संपर्क साधून बीले जमा करून घ्यावेत अशी विनंती कारखान्याचे व्हा. चेअरमन मोहनराव जगताप यांनी केली आहे.

एखाद्या आरोपीला जातीचा चेहरा लावणं गंभीर आहे. उद्या जातीजातीत दंगली होतीलङ्क, असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून दर्पणदिन साजरा

### पाटोदा मराठी पत्रकार परिषदेचा कौतुकास्पद उपक्रम



पाटोदा प्रतिनिधी :-पाटोदा तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने दरवर्षी दर्पण दिन अर्थात पत्रकार दिन विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात येत असतो त्या अनुषंगाने याही वर्षी जिल्हा परिषद शाळा भिमनगर येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार इद्रिस चाऊस व बबन उकांडे हे होते.आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी मराठी भाषेतील पहीले नियतकालिक दर्पण सुरू केले होते.याचे स्मरण म्हणून ६ जानेवारी हा दिवस दर्पण दिन अर्थात पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो.पाटोदा मराठी पत्रकार परिषद नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर राहून समाजाचे प्रश्न लेखनीच्या माध्यमातून मांडत असतानाच केवळ लेखनीतुन सम ाजाचे प्रश्न सुटणार नाही या उध्दात हेतुने सामाजिक कार्यात अग्रस्थानी राहून आरोग्य शिबीर, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप,वृक्षारोपण,विविध परिक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप म्हणून सत्कार सोहळे आदी उपक्रम राबविले जातात याच अनुषंगाने ६ जानेवारी सोमवार रोजी दर्पण दिनानिमित्त जि.प.शाळा भिमनगर तसेच जि.प.उर्दु शाळा अरबगल्ली येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करत साजरा करण्यात आले.तसेच जेष्ठ पत्रकार इद्रिस चाऊस, बबन उकांडे, अब्दुल कादर मकराणी आदींचे यथोचित सत्कार करून सन्मान करण्यात आले. यावेळी पत्रकार संजय सानप यांना बीड पत्रकार संघाच्या वतीने दर्पणकार पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले.कार्यक्रमाचे प्रस्तावित हमीदखान पठाण यांनी केले तर पाटोदा शाखेचे अध्यक्ष अजय जोशी यांनी मार्गदर्शन करतांना पत्रकारांच्या अडचणी तसेच शासनाकडे पत्रकार भवन तसेच पत्रकारांना वसाहत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे सांगितले यावेळी अजय जोशी, प्रा.खंडागळे, हमीदखान पठाण,संजय सानप, भाऊसाहेब पवार,बबन उकांडे, इद्रिस चाऊस, जावेद शेख,आशोक भवर,नानासाहेब डिडुळ,हरिदास शेलार, बबन पवार, सचिन गायकवाड, गोकुळ इंगोले,महेश बेंद्रे, महेशर पटेल,फय्याज सय्यद,सतिष गर्जे,गणेश शेवाळे, बंडू डिडुळ आदी पत्रकार उपस्थित होते..

## लाडक्या बहिणींना मोठा दिलासा, योजनेबाबत नवी अपेडट काय?




जर आमचं सरकार सत्तेत आलं तर आम्ही महिलांच्या खात्यात २१०० रुपये दर महिन्याला जमा करू अशी घोषणा महायुतीच्या नेत्यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान केली होती, त्यामुळे आता २१०० रुपये कधीपासून मिळणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. येत्या मार्चपासून २१०० रुपये मिळण्याची शक्यता आहे. मात्र त्यापूर्वी महत्त्वाची बातमी समोर आली ती म्हणजे ज्या महिला निकषात बसणार नाही, आणि त्यांची जर तक्रार आली तर त्यांच्या अर्जाची पुन्हा पडताळनी होणार आहे. याबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी काही दिवसांपूर्वीच माहिती दिली आहे.ज्या कुटुंबाचं उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा जास्त आहे, ज्या महिलेच्या मालकीची कार आहे. तसेच ज्या लाभार्थी महिलेचं आधार कार्डला एक नाव आणि बँक खात्यामध्ये दुसरं नाव आहे, अशा महिलांची तक्रार आली तर त्यांच्या अर्जाची पडताळणी होईल, मात्र जीआरमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही असं तटकरे यांनी म्हटलं होतं. तटकरे यांच्या या माहितीनंतर योजनेबाबत चर्चेला उधाण आलं होतं. अखेर यावर आता विधान परिषदेच्या उपसभापती निलम गा-्हे यांनी मोठी अपडेट दिली आहे.

## सरकार धनंजय मुंडेंना वाचवण्याचा प्रयत्न करतंय - जितेंद्र आव्हाड

मरणारा तर गेला, त्याला म ारणा-याचं उदात्तीकरण झालं तर महाराष्ट्राचं वाटोळं होईल, हे आम्ही विधानसभेच्या सुरूवातीलाच बोललो होतो. मेलेल्याला जात असते का ? संतोष देशमुख प्रकरणात माणुसकीची हत्या झाली आहे, त्यांना जाळून मारलंय. या सगळ्या प्रकरणाची घृणा राज्यभरात पसरली आहे, त्यात जात आणू नका. आम्ही संविधानात्मक पद्धतीने धनंजय मुंडेंचा राजीनामा मागतोय आणि ३०२ मध्ये वाल्मिक कराडला आरोपी करावा अशी आमची पहिल्या दिवसापासूनची मागणी आहे,असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले.

याच्या आधी झालेल्या सर्व गुन्ह्यांची चौकशी झाली पाहिजे. याआधी बीडमध्ये जे गुन्हे झालेत ते सर्व उघड झाले पाहिजेत. सरकार धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराडला वाचवण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोपही आव्हाड यांनी केला.

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे राज्यातलं वातावरण प्रचंड तापलं आहे.विरोधकांकडून सातत्याने याप्रकरणावरून सरकारला धारेवर धरलं जात असून आज सर्वपक्षीय शिष्टमंडळाने राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची भेट घेत त्यांना निवेदन दिलं. यामध्ये भाजपचे सुरेश धस, स्वराज्य संघटनेचे अध्यक्ष संभाजीराजे भोसले, काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार, शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर तसेच जितेंद्र आव्हाड यांच्यासह अनेकांचा समावेश होता. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधनाता आव्हाड यांनी हा आरोप केला.

# शासन शेतक-याच्या बाजुने सतत बोलते परंतु कृतीमात्र शेतकरी विरोधी - भाई विष्णुपंत घोलप

पाटोदा (प्रतिनिधी) शासनाच्या हमीभावाने सोयाबीन खरेदीला सतत बारदान्यामुळे अडचण येते ती तात्काळ दुर करावी. शासनाने खरेदी केलेल्या मालाला प्रत्येक तालुक्यात साठवुकीसाठी गोडाऊन करण्यात यावे. शासनाने हमी भावाने खरेदी केलेल्या मालाचे पैसे २४ तासाच्या आत देण्याची तरतुद शासनाने करावी. महाराष्ट्र राज्य कृषीपणन मंडळाची शेतमाल तारण कर्ज योजना गोडाऊन नसल्यामुळे शेतक□यांना त्या योजनेचा फायदा होत नाही. शासन एका बाजुला शेतक□यांच्या बाजुने बोलत असते परंतु कृती मात्र शेतकरी विरोधी असल्याचे उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांच्या मार्फत लेखी निवेदनाव्दारे भाई विष्णुपंत घोलप यांनी राज्याच्या कृषीमंत्री यांना कळविले आहे. शासन आणि कृषीमंत्री यांनी वरील विषया संदर्भात तात्काळ दखल घ्यावी आज तालुका पाटोदा येथील शासनाची हमीभावाने सोयाबीन खरेदी बारदाना नसल्यामुळे अडचणीत आली आहे. खरेदी केलेला माल साठवणुकीसाठी सोलापुर (करमाळा), अहिल्यानगर(खर्डा)आणि बीड या ठिकाणी सोयाबीन पाठवावी लागत आहे. गोडाऊनसाठी कृषी उत्पन्न बाजार




समिती वखार महामंडळ आणि शासन म्हणजे महसुल विभाग यांनी आत्तापर्यंत दुर्लक्ष केलेले असुन विकासाच्या नावाखाली शेतकरी मात्र कृषी पणन मंडळाची शेतमाल तारण कर्ज योजना तसेच इतर योजनेपासुन दुर्लक्षीत राहीला आहे त्याची दखल कृषीमंत्री व शासनाने तात्काळ घ्यावी. तसेच शेतक□यांना कोणतीही वस्तु उधार मिळत नाही परंतु त्याने पिकविलेला माल शासन उधारीने खरेदी करीत आहे. त्यासाठी हमीभावाने केलेल्या मालाचे पैसे २४ तासाच्या आत देण्याची तरतुद शासनाने तात्काळ करावी. शासन शेतक□याच्या बाजुने सतत बोलत आहे परंतु कृतीमात्र शेतकरी विरोधी असल्यामुळे शेतकरी सतत शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे आर्थिक अडचणीत येत आहे. याची वेळीच दखल घेतली नाही तर शेतक□यांचा उद्रेक अटळ आहे. याची शासनाने गांर्भीयाने दखल घ्यावी असे लेखी निवेदनाव्दारे उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री व माहितीस्तव बीड जिल्ह्याचे खासदास मा.बजरंग(बप्पा) सोनवणे ,आ.सुरेश धस, शेकापचे सरचिटणीस आ.भाई जयंत पाटील,जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड आणि सहाय्यत निबंधक सहकारी संस्थ ता.पाटोदा यांना कळविले आहे.

, सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ प्रशांत देशमुख व केव्हीके मधील शास्त्रज्ञ डॉ किशोर जगताप, डॉ श्रीकृष्ण झगडे, डॉ तुकेश सुरपाम, दत्तप्रसाद वीर,विजय चांदणे, सुधाकर काटे, उमेश वारे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात डॉ. डी. के. पाटील, डॉ एस. बी. पवार, डॉ वसंत सूर्यवंशी, डॉ गजानन गडदे, डॉ. संतोष चिक्षे, दैनिक सकाळ ॲग्रोवन चे श्री. संतोष मुंढे, पवार यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी महिला तसेच शेतकरी उपस्थित होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com